# महाराष्ट्र विधानसभा

**दुसरे अधिवेशन, २०२३**

**सन २०२३-२४ च्या पुरवणी मागण्यांवरील**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**मंगळवार, दिनांक २५ जुलै, २०२३**

## ग्रामविकास विभाग

### कपात सूचनांची एकूण संख्या - १४

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एल-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २५१५, इतर ग्रामीण विकास कार्यक्रम**<br>**बाब क्रमांक: १६२, रूपये:- १५,००,००,००,०००/-**<br>**श्री. राजेश एकडे** |
| (१) | ६०६४ | १० | बुलढाणा जिल्हयातील मलकापुर व नांदुरा तालुक्यांमध्ये ग्रामीण भागातील विकासाकरीता, ग्रामीण भागातील लोकाना चांगली जीवनशैली जगता यावी या करिता त्यांना मूलभूत सुविधा पुरवणे महत्वाचे आहे त्या करिता रस्ते, नाल्या, सभागृहे असणे आवश्यक आहे त्याकरिता निधी ची मागणी होत असणे, निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही वउपाययोजना. |
| | | | **श्री. विश्वजित कदम** |
| (२) | ६०८१ | १० | सांगली जिल्हयातील कडेगाव तालुक्यातील वडियेरायबाग ते जगताप वस्ती पर्यंत रस्ते अत्यंत खराब झालेले असून सदर रस्ता दुरुस्ती करण्यासाठी निधी उपलब्ध करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. लहू कानडे** |
| (३) | ६०४७ | १० | अहमदनगर जिल्ह्यातील राहुरी तालुक्यातील मौजे मुसळवाडी स्मशानभूमी ते इंगळे वस्ती रस्ता मजबुतीकरण करणे, ता. राहुरी या कामाला 2515 अंतर्गत निधी मंजूर करण्यात आला होता परंतु काही कारणास्तव या कामाला स्थगिती देण्यात आलेली असणे, गावच्या विकासासाठी सदरच्या कामावरील स्थगिती उठवण्यात यावी व या विकास कामांना निधी उपलब्ध करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपायोजना. |
| | | | **श्री. संजय जगताप** |
| (४) | ६०७९ | १० | राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानांतर्गत ग्रामपंचायतीना कार्यालयीन इमारत व नागरी सुविधा केंद्र(सी.एस.सी खोली) बांधकामास निधी मिळणेसंदर्भात सासवड हे पुरंदर तालुक्यात अनेक ग्रामपंचायतींना शासनाच्या विविध योजना व सेवा त्याचप्रमाणे दाखले, जॉब कार्ड, ग्रामपंचायत मिळतींची माहिती इ. ऑनलाईन प्रणालीद्वारे |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | माहिती सर्व सामान्य नागरीकांना आपल्या गावातच मिळण्याकरीता सी.एस.सी केंद्राच्या इमारतीसाठी निधी उपलब्ध होण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. विक्रमसिंह सावंत** |
| (५) | ६०५७ | १० | जत विधानसभा मतदारसंघातील सन 2012-22 या आर्थिक वर्षाकरीता मा.लोकप्रतिनिधीनी सुचविलेल्या ग्रामीण भागातील गावातंर्गत मुलभूत सुविधा पुरविणे, 2515,1238 योजनेतंर्गत विकासकामांना ग्रामविकास व पंचायतराज विभाग शासन निर्णय क्र.विकस-2022 /प्र.क्र.50 /योजना-6/दि.31 मार्च,2022 नुसार निधी वितरणासह प्रशाकिय मान्यता देण्यात आलेली असणे, परंतू प्रशासकिय मान्यता प्राप्त कामांना स्थगिती देण्यात आलेली असणे, सदर मंजूर कामे अत्यंत आवश्यक असून कामे निविदा प्रक्रियेत असणे,याबाबत वारंवार स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडू स्थगिती उठण्याबाबत लेखी पत्रव्यवहार केलेला असणे, परंतू अद्यापही यावर कोणतीही कार्यवाही झालेली नसणे, सदर कामावरील स्थगिती हटविण्याची नितांत आवश्यकता असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. मोहनराव हंबर्डे** |
| (६) | ६०८५ | १० | "नांदेड दक्षिण विधानसभा मतदार संघातील ग्रामीण भागातील गावांना मुलभूत सोयीसुविधा अद्यापही अपूर्ण असल्यामुळे शासनाच्या ग्रामविकास विभागाच्या २५१५ (मुलभूत सोयीसुविधा योजना) या योजनेअंतर्गत जास्त निधीची तरतूद करणे आवश्यक असून शासनाने सदर मतदार संघातील प्रत्येक गावामध्ये स्थानिक मुलभूत सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी व ग्रामीण भागातील विकास करण्यासाठी ग्रामविकास विभागाने सदर योजनेमध्ये भरीव निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एल-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ३०५४, मार्ग व पूल**<br>**बाब क्रमांक: १६३, रूपये:- २०,००,००,००,०००/-**<br>**श्री. विश्वजित कदम** |
| (७) | ६०८० | १० | सांगली जिल्हयातील कडेगाव तालुक्यातील वडियेरायबाग ते भगतमळा पर्यंत रस्ते अत्यंत खराब झालेले असून सदर रस्त्याला निधी उपलब्ध करण्याची आवश्यकता असून याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. धिरज देशमुख** |
| (८) | ६०४२ | १० | ग्रामा ७१ खरोळा - कुंभारवाडी ता.रेणापूर ५ किमी रस्ता दुरूस्त करणे अत्यंत गरजेचे असणे. रस्त्याची अत्यंत दुरावस्था झाली असून नागरिकांची गैरसोय होत असणे. याबाबत राज्य शासनाने तातडीने सदर रस्त्यांसाठी निधीची तरतुद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (९) | ६०४३ | १० | ग्रामा ६ गाधवड - वांजरखेडा ता.लातूर ३ किमी रस्ता व पूल करणे अत्यंत गरजेचे असणे. रस्त्याची अत्यंत दुरावस्था झाली असून नागरिकांची गैरसोय होत असणे. याबाबत राज्य शासनाने सदर रस्त्यांसाठी निधीची तरतुद करण्याची आवश्यकता व करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१०) | ६०५६ | १० | ग्रामा ७१ खरोळा - कुंभारवाडी ता.रेणापूर ५ किमी रस्ता दुरूस्त करणे अत्यंत गरजेचे असणे. रस्त्याची अत्यंत दुरावस्था झाली असून नागरिकांची गैरसोय होत असणे. याबाबत राज्य शासनाने सदर रस्त्यांसाठी निधीची तरतुद करण्याची आवश्यकता व करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (११) | ६०६७ | १० | मौ सिरसम (पा.) ता.पालम जिल्हा परभणी या गावातील रस्त्यांचे सिमेंट काँक्रीटीकरण करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, रस्त्याअभावी ग्रामस्थांना अनंत अडी अडचणींना तोंड द्यावे लागत असणे, त्यामुळे गावातील रस्त्यांचे सिमेंट काँक्रिटीकरण करण्याकडे दुर्लक्ष केले असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१२) | ६०६८ | १० | मौजे नायरी मराठवाडी ते स्मशानभूमी (ता.संगमनेर,जि.रत्नागिरी) या रस्त्याचे सिमेंट कॉक्रिटीकरण करुन पाकाडी करण्याची गरज असणे, याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी स्थानिक नागरीकांत निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१३) | ६०६९ | १० | संगमनेर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील उमरे या गावात उमरे मेन रस्ता ते कोंडउमरे या मार्गावरील ५ किलोमीटर अंतराच्या रस्त्याची अंतत्य दुरावस्था झाल्यामुळे सदर रस्त्याच्या दुरुस्तीचे काम मंजूर करुन सदर रसत्याची तातडीने खडीकरण व डांबरीकरण करुन रस्त्याची दुरस्ती करण्याबबात उमरे ग्रामपंचायतीने ठराव मंजूर करुन शासनाकडे पाठविणे, सदर रस्त्याची दुरावस्था झाल्यामुळे नागरीकांना व रुग्णांना कोंडउमरे येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये औषधोपचारासाठी जाण्यासाठी १० कि.मी.पेक्षा जास्त अंतर वळसा घालून प्रवास करावा लागणे, कोंडउमरे व आजूबाजूच्या गावातील नागरकांच्या होणाऱ्या गैरसोयीचा विार करुन रस्त्याच्या कामासाठी निधी उपलबध करुन देण्याबाबत शासनाकडे अनेकदा निवेदन व तक्रारी देण्यात येणे, परंतु अद्यापही याबाबत शासनाने कोणतीही कार्यवाही करण्यात न येणे, परिणामी स्थानिक जनतेत पसरलेली तीव असंतोषाची व नाराजीची भावना, याबाबत शासनाने त्वरीत चौकशी करुन भविष्यात उक्त रस्त्यामुळे कोणतीही जिवीतहानी होऊ नये यासाठी सदर रस्त्यासाठी तातडीने निधी उपलब्ध करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. मोहनराव हंबर्डे** |
| (१४) | ६०८९ | १० | “नांदेड दक्षिण विधानसभा मतदार संघातील ग्रामीण भागातील अनेक रस्ते खराब असल्यामुळे शासनाच्या ग्रामविकास विभागाच्या 3054 या योजनेअंतर्गत जास्त निधीची तरतूद करणे आवश्यक असून शासनाने सदर मतदार संघातील प्रत्येक गावामध्ये नागरिकांना चांगले रस्ते करुन देण्यासाठी व ग्रामीण भागातील विकास करण्यासाठी ग्रामविकास विभागाने सदर योजनेमध्ये भरीव निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : २४ जुलै, २०२३**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव (१) (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) ग्रामविकास विभाग (१० प्रती)
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई